16-17 (11)

Vasundhara Kala Mahavidyalaya, 22 Mhada Jule, Solapur.

NAAC ACCREDITED WITH 'B' GRADE

(AFFILIATED TO SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR)

One Day Interdisciplinary International Conference on

# NEW TRENDS IN HIGHER EDUCATION

26 March 2017

SPONSORED BY
UNIVERSITY GRANTS COMMISSION
(WRO) PUNE

ORGANIZED BY


IQAC-VASUNDHARA KALA MAHAVIDYALAYA
JULE SOLAPUR

MARATHI - I

CHIEF ORGANIZER
PRIN. DR. B. V. CHOUDHARI

CONVENER
MR. S. M. UGHADE

CO-CONVENER
MR. P. G. KOLHE



AJANTA PRAKASHAN

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE DEGLOOR Dist. Nanded



## मराठी अनुक्रमाणिका



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| ५० | शारीरिक शिक्षणातील उच्च शिक्षण हि काळाची गरज<br>प्रा. विशाल प्रकाश गायकवाड | १६६-१६७ |
| ५१ | मराठी भाषेत व्यवस्था परिवर्तनासाठी निर्माण झालेल्या साहित्याची प्रेरणा आणि स्वरुप<br>कल्याण नामदेव श्रावस्ती | १६८-१७० |
| ५२ | महाराष्ट्रातील अब्राह्मणी इतिहासलेखन प्रवाह<br>प्रा. घाडगे सोमनाथ व्यंकटी | १७१-१७३ |
| ५३ | महात्मा गांधीजींच्या ग्रामस्वराज्य संकल्पनेचे महत्व<br>प्रा. डॉ. संतोष तुकाराम कदम | १७४-१७८ |
| ५४ | भारतातील शिक्षण<br>नयु धंदाडे | १७९-१८२ |
| ५५ | पाली साहित्यातील प्रतिबिंबीत होणारे मैत्री बल<br>प्रा. डॉ. केवटे अशोक आर.<br>सोलनिंदा सोमिनाथ दाभाडे | १८३-१८५ |
| ५६ | महात्मा गांधीजीचे शैक्षणिक चिंतन : एक अभ्यास<br>डॉ. भालेराव जे. के. | १८६-१८८ |
| ५७ | इतिहास लेखनातील नवीन प्रवाह - स्थानिक इतिहास लेखन<br>डॉ. नंदकुमार ज्ञानोबा जाधव | १८९-१९० |
| ५८ | मराठी कादंबरी आणि अस्तित्त्ववादी प्रवाह<br>डॉ. भाऊसाहेब दा. गव्हाणे | १९१-१९४ |
| ५९ | राज्यशास्त्रातील नवप्रवाह : डेव्हिड ईस्टन यांचे योगदान<br>डॉ. राजू भागाजी बनारसे<br>डॉ. सत्यपाल हरिभाऊ कांबळे | १९५-१९९ |
| ६० | पाली साहित्यातील नविन बदल/ वाढ<br>बहिरव निर्मला बाळकृष्ण | २००-२०३ |
| ६१ | पालि साहित्यातील नवीन संकल्पना<br>धनराज ना. गोंडाणे | २०४-२०६ |
| ६२ | इतिहासाच्या नवीन विचार प्रवाहातुन वंचिताचे लेखन<br>प्रा. गुंजकर सोमनाथ लक्ष्मण | २०७-२०९ |
| ६३ | क्रिडा क्षेत्रातील व्यक्ति व खेळाडूसाठी संतुलित आहाराचे उपयोजन<br>प्रा. डॉ. विठ्ठल रामकिशन भोसले | २१०-२१३ |
| ६४ | शंकर पाटील यांच्या ग्रामीण कथासंग्रहातील नारी चित्रण<br>प्रा.डॉ.विठ्ठल जंबाले | २१४-२१७ |
| ६५ | वस्तु आणि सेवाकर : लाभ व आव्हाने<br>प्रा. डॉ. अशोक टिपरसे | २१८-२२१ |





227

आंतरराष्ट्रीय चर्चासत्र - २०१७
ROYAL-ISSN-2278-8158 - Impact Factor - 4.42

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR

६५

# वस्तु आणि सेवाकर : लाभ व आव्हाने

प्रा. डॉ. अशोक टिपरसे
संशोधन मार्गदर्शक & अर्थशास्त्र विभागप्रमुख, देगलूर महाविद्यालय, देगलूर जि. नांदेड.

## प्रस्तावना

राजा महाराजाच्या काळापासून करावसुलीची पध्दत भारतात प्रचलित असल्याचे आढळून येते. त्यातल्या त्यात अशोक आणि अकबर या राजानी राबवलेली करपध्दती उल्लेखनीय मानली जाते. त्यांनी राज्यशकट चालविण्यासाठी आवश्यक महसूल कराव्दारे मिळविताना सामान्य माणसावर जास्त भार पडणार नाही. याची काळजी घेतली होती. आताची कर रचना विविधस्तराची केद्र, राज्य आणि स्थानिक संस्थानाकडून अनेक विविध प्रकारचे कर असल्यामुळे सामान्य माणसाना थेट पभावित करणारे आहेत. त्यामुळे भारतीय करपध्दती ही सर्वात क्लिष्ट मानली जाते. जागतिक बदलाना अनुसरुन अलिकडेच मंजुर करण्यात आलेला वस्तु सेवा कर अर्थात जी.एसटी. कायदा हा भारताच्या करविषयक सुधारणाच्या इतिहासातील सर्वात महत्वाची घटना म्हणावी लागेल.

## अभ्यासाची उद्दिष्टये

१) जीएसटी ही संकल्पना समजून घेणे.
२) जीएसटी प्रणालीतील प्रमुख घटक अभ्यासणे.
३) जीएसटी कराच्या दराचा अभ्यास करणे.
४) जीएसटी चे लाभ व आव्हाने यांचा अभ्यास करणे.

सरकारला खर्चासाठी मोठया प्रमाणात महसूल हवा असतो परंतु त्यापेक्षा कमी महसूल मिळतो. कारण देशात कर चुकवेगीरी मोठया प्रमाणात असते. त्यामुळे सरकारला कल्याणकारी योजना राबवण्यासाठी मोठया प्रमाणात अडचणी येतात. जागतिक पातळीवर कराव्दारे होणाऱ्या महसुलाचा जी.डी.पी. मधील हिस्सा पहिल्यास ब्राझीलचा हिस्सा ३४.४ टक्के, चीनचा २२ टक्के, रशियाच्या १९.५ टक्के, दक्षिण अफ्रिकेचा २६ टक्के, आस्ट्रेलियाचा २५.८ टक्के, जपानचा २८.३२ टक्के, ब्रिटनचा ३९ टक्के, अमेरिकेचा २६.९ टक्के, फ्रान्सचा ४४.६ टक्के, स्विडनचा ४५.८ टक्के आणि जर्मनीचा ४०.६ टक्के आहे तर भारताचा १७.७ टक्के इतका कमी आहे.

कराचे वर्गीकरण केल्यास प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यख असे प्रमुख दोन प्रकार पडतात भारतात या दोन करांचे करापासून मिळणाऱ्या महसुलात प्रत्यक्ष करापासून मिळणारा महसूल यामध्ये जास्त अंतर नाही. प्रत्यक्ष कर हा ज्याच्यावर आकारला जातो. त्याच्यावर त्याचा भार असतो. मात्र अप्रत्यक्ष कारभार हा संपुंर्णतः उपभोक्ता वर्गावरच असतो. भारतात २०१५-२०१६ या आर्थिक वर्षात एकुण करप्राप्त महसुलामध्ये प्रत्यक्ष कराचा वाटा ५५.६ टक्के असून अप्रत्यक्ष कराचा वाटा ४४.४ टक्के आहे.

## GST म्हणजे काय ?

वस्तु व सेवा कर किंवा GST (Good s and Service Tax ) हा अप्रत्यक्ष कर (Indirect Tax) असून तो वस्तु किंवा सेवांच्या उत्पादन, विक्री व वापरावर एकात्मिक पध्दतीने आकारला जातो. सध्या देशात वस्तु व सेवांवर विविध प्रकारचे कर आकरले जातात. GST हा इतर बहुतेक अप्रत्यक्ष करांची जागा घेणार असून त्यामुळे कर आकारणीत सुटसुटीतपणा आणला जाणार आहे.

वस्तु व सेवाकर म्हणजेच जीएसटी १ जुलै २०१७ पासून देशात लागू होणार आहे. जानेवारी २०१७ मध्ये झालेल्या जीएसटी कौन्सिलच्या बैठकीत हा निर्णय झाला . अगोदर १ एप्रिल २०१७ पासून जीएसटी लागू करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र केंद्र व राज्यांच्या विविध मागण्यामुळे १ जुलै रोजी जीएसटी प्रणाली देशभरात लागू होणार आहे. जीएसटी लागू करण्यासाठी जास्तीत जास्त मुदत १६ सप्टेबर २०१७ ही आहे. राज्य व केंद्र सरकारच्या वेगवेगळया करप्रणालीना पर्याय म्हणून जीएसटीकडे पाहिले जाते. जीएसटी ही भारतातील सर्वात मोठी आर्थिक सुधारणा आहे. या करप्रणालीमुळे करचुकव्यांना चाप बसणार असून राज्य सरकार तसेच सर्वसामान्यांना यामुळे कोणताही त्रास होणार नाही.

ROYAL -ISSN-2278-8158 - Impact Factor - 4.42

## GST ची आवश्यकता

भारतातील अप्रत्यक्ष करप्रणालीमध्ये असलेलया दोषांमुळे नमुद समस्या निमाण झाल्या आहेत. या दोषांवर खालील उपाय म्हणून GST लागू कण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

१) केंद्र आणि राजय सरकारांव्दारे अनेक तसेच वेगवेगळे अप्रत्यक्ष कर आकारले जातात. त्यामुळे भारतातील अप्रत्यक्ष करप्रणाली अतिशय गुंतागुंतीची बनली आहे. या कर प्रणालीतील निर्णयांची पुर्तता करता करता करदात्यांच्या नाकी नऊ येते.

२) सध्या वस्तू व सेवा व्यवहारातील विविध टप्प्यांवर कर आकारणी केली जाते. अनेकदा करांवर कर आकारला जातो आणि त्यामुळे आपोआपच वस्तू व सेवांच्या किमतीमध्ये वाढ होते. याला Cascading effect म्हणतात.

३) देशातील अप्रत्यक्ष करप्रणाली किचकट असल्यामुळे इतर देशांच्या तुलनते भारतातील व्यवहार खर्च खूप जास्त आहे. परकीय गुंतवणूक आर्कार्षत करण्याच्या अनुषंगाने ही बाब नकारात्मक आहे.

४) देशाच्या विविध राज्यांतील वेगवेगळी अप्रत्यक्ष करप्रणाली आंतरराज्य व्यवहारांच्या विकासासाठी प्रतिकूल ठरत आहे.

५) गुंतागुंतीच्या करप्रणालीमुळे देशातील अप्रत्यक्ष करांचे संकलनही समाधानकारक नाही. तसेच कर संकलनामध्ये भ्रष्टाचाराने शिरकाव केला आहे.

## GST खालील अप्रत्यक्ष करांची जागा घेणार

**A) केंद्रीय कर :**

१) केंद्रीय उत्पादन शुल्क (Central Excise Duty)

२) अतिरिक्त उत्पादन शुल्क (Additional Excise Duty)

३) मेडिकल ॲंड टॉयलेट प्रीपरेशन ॲक्ट १९५५ अंतर्गत उत्पादन शुल्क

४) सेवा कर (Service Tax)

५) अतिरिक्त सीमा शुल्क (Additional Duty of Cusotms (SAD)

६) राज्याचे अधिभार व उपकर (State Cesses and Surcharges)

७) जकात व प्रवेश कर (Octrol and Entry Tax)

## GST मध्ये समाविष्ट न झालेले अप्रत्यक्ष कर उत्पादने

- मुलभूत सीमा शुल्क (Basic Customs Duty)
- मुद्रांक शुल्क (Stamp Duty)
- विद्युत कर (Electricity Duty)
- पेट्रॉलियम उत्पादने (कच्चे पेट्रोलियम, आय स्पीड डिझेल, कोटार स्पिरीट (पेट्रोल), नैसर्गिक वायू आणि विमान इंधन)
- मानवी वापरासाठीचे मद्य (Alcoholic liquor for human consumption)

## जीएस.टीचे दर निश्चित

- जीएसटी परिषदेच्या ३ नोव्हेंबर २०१६ रोजी पार पडलेल्या बैठकीत चारस्तरीय जी.एस.टी. चे दर निश्चित करण्यात आले असून ५,१२,१८ आणि २८ टक्केअसे एकुण चार स्तर निश्चित करण्यात आले आहेत.
- केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या दोन दिवसीय जीएसटी परिषदेच्या पहिल्याच दिवशी या कररचनेवर सहमती साधण्यात आली.
- या बैठकीमध्ये जीएसटी कर आकारणीचे दर, सेस, लेव्ही व राज्यांचे अधिकार यांसह काही वादग्रस्त मुद्यांवरही चर्चा करण्यात आली.

- केंद्र सरकारने ६, १२,१८ आणि २६ टक्के अशी चारस्तरीय कररचना जीएसटीसाठी सुचविली होती, मात्र चर्चेअंती वरील दरांवर सहमती झाली.

**इतर प्रमुख मुद्दे**

- अलिशान मोटारी, तंबाखू, शीतपेये यांच्यावर सर्वाधिक २८% कर आकारला जाणार असून त्याबरोबरच अतिरिक्त सेस (उपकर) आकारला जाणार आहे.
- या अतिरिक्त सेस (उपकर) आणि स्वच्छ ऊर्जा उपकरातून मिळणाऱ्या रकमेतून राज्यांना पाच वर्षांसाठी जीएसटी घटीची नुकसान भरपाई दिली जाणार आहे व त्यानतर हे उपकर संपुष्टात येणार आहेत.
- नव्या करामुळे राज्यांना जे नुकसान सोसावे लागेल, त्यासाठी ५० हजार कोटी रुपयांचा विशेष निधी तयार करण्याचे केंद्राने ठरविले आहे.
- हा निधी वरील उपकरातून उभारण्यात येणार आहे.
- जीएसटीमध्ये अनेक केंद्रीय तसेच राज्यस्तरीय कर विलीन होणार आहेत. विशेषतः उत्पादन शुल्क (एक्साइज), सेवा कर, मुल्यवर्धित कर (व्हॅट) हे पहिल्या वर्षीच यामध्ये विलीन होणार आहेत.
- सोन्यावर चार टक्के जीएसटी लागू करण्याचा प्रस्ताव केंद्रातर्फे सादर करण्यात आला, परंतु त्यावर एकमत होऊ न शकल्याने त्यावरील निर्णय पुढे ढकण्यात आला आहे.

**जीएसटी परिषद**

जीएसटीचे दर तसेच त्यात देण्यात येणाऱ्या सवलतीबाबत ही परिषद निर्णय घेणार आहे.

जीएसटीच्या कक्षेत कोणत्या वस्तुंचा समावेश करावा तसेच कोणत्या वस्तू जीएसटीतून वगळाव्या याबाबत निर्णयही ही परिषद घेणार आहे.

जीएसटी संदर्भातील सर्व नियम घेण्याचा अधिकार असलेली जीएसटी परिषद ही सर्वोच्च संस्था आहे.

संपूर्ण देशात एकच करप्रणाली लागू करण्याची जबाबदारी या परिषदेवर राहणार आहे.

या परिषदेत राज्यांचे दोन तृतीयांश तर केंद्राचे एक तृतीयांश बहुमत राहणार आहे.

नव्या कायद्याने तीन प्रकारच्या जीएसटी स्थापन केल्या जाणार आहेत.

**जी एसटीचे लाभ**

१) जीएसटीमुळे आर्थिक साधने वाढून दारिद्रय निर्मुलन विकासास हातभार लागेल.

२) राज्य व केंद्राचे दर समान होतील. पेट्रोलियम, तंबाखू, अल्कोहोल यावर केंद्र, राज्याचे कर, राहतील

३) जीएसटीमुळे करावर कर आकारणीस आहा बसणार बसून महागाई कमी होईल.

४) जीएसटीमुळे देशाच्या एकुण देशांतर्गत उत्पन्नामध्ये (GDP) वाढ होईल.

५) संध्याची गुंतागुंतीची करप्रणाली GST मुळे साधी सोपी होणार आहे. सध्या आकारल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांसाठीच्या वेगवेगळया व कित्येक अप्रत्यख करांऐवजी GST ही एकात्मिक कर पध्दत नागरिकांसाठी सुलभ ठरणार आहे.

६) GST कर पध्दतीमुळे संपूर्ण देशातील बाजारपेठेचे एकत्रीकरण होणार असून याद्वारे आंतरराज्य व्यवहारांमध्ये वाढ होण्याची शक्यता वाढली आहे.

७) GST कर प्रणालीतील कर माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आकरणीत सुलभता येईल व त्यामुळे कर संकलनामध्ये वाढ होणे तसेच भ्रष्टाचारास आळा बसणे अपेक्षित आहे.

८) जगातील जवळपास १४० हून अधिक देशांनी याआधीच GST कर प्रणाली आत्मसात केली असून GST करप्रणाली आर्थिक सुधारणांचा अविभाजय घटक इरली आहे.

## जीएसटी समोरील आव्हाने

- जीएसटी विधेयकामध्ये पेट्रोलियम उत्पादनेत मद्य या वस्तुना जीएसटी कर प्रणालीच्या बाहेर ठेवले आहे. ही उत्पादने सरकारला भरपूर महसूल प्राप्त करुन देणारी असताना जीएसटी कर प्रणाली बाहेर ठेवण्यामागची भूमीका स्पष्ट नाही.
- तज्ञाच्या मते, जीएसटी कर प्रणाली ही दीर्घ कालावधी नंतरच फायदयांची ठरणारआहे. त्यामुळे जीएसटी अमलबजावणीनंतर काही कालावधीसाठी तरी जनतेला उच्च कर आकारणी सोसावी लागण्याची शक्यता आहे.
- काही तज्ञाच्या मते, प्रस्तावित जीएसटी विधेयकातील CGST, SGST कर म्हणजे दुसरे काही नसून अनुक्रमे केंद्रीय उत्पादन शुल्क व व्हेट यांची नवी नावे आहेत.
- तज्ञाच्या मते हा दर २० टक्यापेक्षा जास्त राहिल्यास महागाई वाढ, परकीय गुंतवणूकीवर प्रतिकुल परिणाम होणार आहे.
- जीएसटी अंमलबजावणीसाठी आयटी सेवा पुरवण्याचे काम GSTN या खासगी कंपनीकडे देण्यात आले आहे. त्यामुळे संपूर्ण देशातील नागरिकांची माहिती हाताळण्याचे काम खाजगी कंपनीकडे देणे सुरक्षेच्या दृष्टीने योग्य आहे का ?
- जीएसटीमुळे राज्याच्या अधिकारात कपात होऊन केंद्रसरकारच्या अधिकारात वाढ होवुन राज्याच्या आर्थिक स्वायत्ततेला धोका निर्माण होऊ शकतो असे एकआयडीएमके पक्षाचे मत आहे.
- अंतर राज्य व्यापारामध्ये आकारण्यात येणाऱ्या एकात्मिक जीएसटी मधील राज्याच्या हिस्सा हा आयातदार राजाला देण्याची तरतूद विधेयकात असल्याने महाराष्ट्र, तामिळनाडू तसेच गुजरातसारख्या राज्याना प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता राज्याची व्यक्त केली आहे.
- जकात व प्रवेश कर यासारखे करामुळे स्थानिक संस्थांना जास्त उत्पन्न मिळणारे जीएसटीमुळे त्यांना करावर पाणी सोडावे लागणार आहे.
- सध्या जवळपास २५ ते ३० टक्याएवढी कर आकारणी होणाऱ्या सिमेंट, वाहन उद्योग, ग्राहकोपयोगी वस्तू, लॉजिस्टिक्स, मनोरंजन, धातू आणि बांधकाम साहित्य या क्षेत्रावर जीएसटी चा सकारात्मक परिणाम अपेक्षित आहे.
- जीएसटी करप्रणालीतील कर माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आकारणीत सुलभता येईल व त्यामुळे कर संकल्पनामध्ये वाढ होणे तसेच भ्रष्टाचारास आळा बसुन कर वाढणे अपेक्षित आहे.

## सारांश

जीएसटी लागू करण्यासाठी केंद्र राज्यानी तसेच विविध राजकीय पक्षानी १२२ वे घटनादुरुस्ती विधेयक पारीत करण्यास मंजूरी दिली आहे. परंतु जीएसटीच्या या नावे रस्त्यावर अजूनही फार मोठे अंतर कापावे लागणार आहे. १ एप्रिल २०१७ ही जीएसटी लागू करण्याची अंतिम मुदत होती. परंतु सरकारला त्याची तारीख १ जुलै २०१७ ही निश्चीत करावी लागत आहे. यावरुन जीएसटी कर प्रणाली पुढील किती आव्हाने आहेत असे लक्षात येते. केवळ कायदे करुन प्रस्तावित आर्थिक सुधारणा शक्य बाब नसून त्यासाठी त्याची नीट अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. जीएसटी च्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जीएसटीबाबत जनजागृती पायाभूत सुविधांची उभारणी विविध स्तरावरील कर अधिकाऱ्यांना नवीन प्रणालीबाबत प्रशिक्षण, केंद्र राज्य यांच्यात सुसंवाद इत्यादी स्तरावर अजून काम करायला भरपूर वाव आहे.

## Bibiography and Reference

१) G Raghuram and K.S. Deepa, (March-२०१५ ) "Goods and Services Tax : The Introduction Process." Indian Institute of Management, Ahmedabad, India, W.P. No. २०१५-०३-०१

२) योजना मासिक , युनिक अकॅडमी , स्पर्धा परीक्षा , w.w.w. relakhs. com/gst-goods-services-tax-in-india/#



Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

231